खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

(सुवर्णमहोत्सवी वर्ष)

प्रसिद्धी विभाग

शैक्षणिक वर्ष : २०२६ -२०२७

मराठी विभाग : वाचन प्रेरणा दिन उपक्रम

पुण्यनगरी

समृद्ध व्यक्तिमत्त्वासाठी वाचन आवश्यक : नानासाहेब टाकळकर

राजगुरू महाविद्यालयात 'वाचन संवाद' उपक्रम

राजगुरुनगर : प्रतिनिधी

वाचनामुळे विचार, कल्पनाशक्ती आणि अभिव्यक्ती विकसित होते. त्यामुळे समृद्ध व्यक्तिमत्त्वासाठी वाचन आवश्यक आहे, असे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे मानद सचिव नानासाहेब टाकळकर यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त आयोजित वाचन दिन कार्यक्रमात ते बोलत होते. या प्रसंगी प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, एमबीए संचालक डॉ. अरविंद शेलार, प्राचार्य डॉ. गोपाळ आलापूरे, उपप्राचार्य व डॉ. संजय शिंदे, ग्रंथपाल पूनम तापकीर, डॉ. प्रतिमा लोणारी उपस्थित होते.

डॉ. कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन नानासाहेब टाकळकर यांच्या हस्ते करण्यात आले.

उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी 'वाचनाचे जीवनातील महत्त्व', डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी 'पुस्तके माणसाला घडवितात', तर प्रा. वैभवी कोपर्डे यांनी 'पुस्तकांचे जीवनातील स्थान' या विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या निमित्ताने मराठी विभागाच्या वतीने 'वाचन संवाद' या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांच्या मुक्त मनोगतांचा आणि पुस्तकांविषयीच्या अनुभवांचा संवादात्मक कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी वाचलेल्या आणि मनाला भावलेल्या पुस्तकांविषयी मोकळेपणाने विचार व्यक्त केले. पुस्तकांमधून मिळालेले अनुभव, प्रेरणा, जीवनमूल्ये आणि विचार यांविषयी विद्यार्थ्यांनी आपली मते मांडली. प्रिया भालसिंगे, अर्पिता बुरुड, तनुप्रिया जैद, सिमरन कोळेकर, सृष्टी रगडे, सुदर्शन टाकळकर, पवन पारधी, प्रतीक लोहकरे आणि अजय चौधरी या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. ग्रंथालय विभागाच्या वतीने पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. संजय शिंदे यांनी केले, तर आभार डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी मानले.

18/10/2026 | Page No: 2 | Sub | Pimpri Chinchwad
epaper.punyanagari.in
Powered by - ePaperwale | 9702476117

केसरी

किरण खुडे (पत्रकार)

समृद्ध व्यक्तिमत्त्वासाठी वाचन आवश्यक : नानासाहेब टाकळकर

राजगुरूनगर, (वार्ताहर) : वाचनामुळे विचार, कल्पनाशक्ती आणि अभिव्यक्ती विकसित होते. त्यामुळे समृद्ध व्यक्तिमत्त्वासाठी वाचन आवश्यक आहे, असे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे मानद सचिव नानासाहेब टाकळकर यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त आयोजित वाचन दिन कार्यक्रमात ते बोलत होते. या प्रसंगी प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, एमबीए संचालक डॉ. अरविंद शेलार, पॉलिटेक्निकचे प्राचार्य डॉ. गोपाळ आलापूरे, उपप्राचार्य व मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे, ग्रंथपाल पूनम तापकीर, डॉ. प्रतिमा लोणारी उपस्थित होते.

डॉ. कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन नानासाहेब टाकळकर यांच्या हस्ते करण्यात आले. ते पुढे म्हणाले की, वाचन ही व्यक्तिमत्त्व विकासाची, विचारांना दिशा देण्याची आणि जीवनाकडे पाहण्याची नवी दृष्टी देणारी कृती आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी गांभीर्याने वाचन करावे, असे आवाहन त्यांनी केले.

उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी 'वाचनाचे जीवनातील महत्त्व', डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी 'पुस्तके माणसाला घडवितात', तर प्रा. वैभवी कोपर्डे यांनी 'पुस्तकांचे जीवनातील स्थान' या विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या निमित्ताने मराठी विभागाच्या वतीने 'वाचन संवाद' या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांच्या मुक्त मनोगतांचा आणि पुस्तकांविषयीच्या अनुभवांचा संवादात्मक कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी वाचलेल्या आणि मनाला भावलेल्या पुस्तकांविषयी मोकळेपणाने विचार व्यक्त केले. पुस्तकांमधून मिळालेले अनुभव, प्रेरणा, जीवनमूल्ये आणि विचार यांविषयी विद्यार्थ्यांनी आपली मते मांडली.

प्रिया भालसिंगे, अर्पिता बुरुड, तनुप्रिया जैद, सिमरन कोळेकर, सृष्टी रगडे, सुदर्शन टाकळकर, पवन पारधी, प्रतीक लोहकरे आणि अजय चौधरी या विद्यार्थ्यांनी उपक्रमात सहभाग घेतला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. संजय शिंदे यांनी केले, तर आभार डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी मानले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख